1.खालील विधाने विचारात घ्या व सत्य विधाने निवडा .

1. 2020 च्या भूक निर्देशांकात भारताचे मध्यम उपासमार गटात वर्गीकरण झाले.

2. गरिबीशी निगडीत रंगराजन समितीने आपला अहवाल 2014 ला सादर केला

3. रंगराजन यांनी सुरेश तेंडुलकर यांनी वापरलेल्या पध्दतीत सुधारणा करून सुधारित मिश्र स्मरण कालावधी पध्दत वापर ली.

खालील कोड वापरून योग्य उत्तर निवडा:

A. 1 व 2 फक्त
B. 2 व 3 फक्त
C. 1, 2 व 3
D. 1 व 3 फक्त

Answer ||| B

Solution |||

रंगराजन समिती

ही समिती 2012 ला नेमली गेली या समितीने आपला अहवाल 2014 ला सादर केला . रंगराजन यांनी सुरेश तेंडुलकर यांनी वापरलेल्या पध्दतीत सुधारणा करून सुधारित मिश्र स्मरण कालावधी पध्दत वापरली. यात त्यांनी वर्षभर लागणाऱ्या वस्तूंचा समावेश केला उदा. कपडे,चप्पल,टिकाऊ वस्तु,शिक्षण व आरोग्य त्याचबरोबर महिन्याच्या खर्चाबरोबर त्यांनी 7 दिवसाला लागणाऱ्या तेल. अंडी,मांस,मासे,भाज्या फळे व मसाला या गोष्टींचाही समावेश केला. या पध्दतीने 2009-10 सालाच्या पुढील वर्षांचाच गरीबी दर काढणे शक्य होतेया पध्दतीने 2009-10 ला 38.
2% इतका गरीबी दर आढळला व 2011-12 ला हाच दर 29. 5% आढळला.

जागतिक भूक निर्देशांक

हा निर्देशांक कंसर्न वर्ल्डवाईड व वेल्थ हंगर हिल्फ या दोन संस्था संयुक्तपणे प्रसिध्द करतात.
2021 च्या या निर्देशांकात भारताचा 116 देशांमध्ये 101 व क्रमांक आला. 2020 मध्ये हा क्रमांक 94 होता.
2021 मध्ये भारताचे गुण 27. 5 होता जो गंभीर उपासमार या सदरात येतो.

2.खालीलपैकी सत्य विधाने ओळखा

1. नियोजनाचा प्रणाली दृष्टीकोन हा नव्याने वापरला जात आहे.

2. नियोजनाचा मानक दृष्टीकोन जग पूर्वीपासून वापरत आहे.

3. प्रणाली दृष्टीकोन हा लक्ष्याधारित आहे.

खलील कोड वापरुन योग्य पर्याय निवडा.

A. 1 फक्त
B. 2 फक्त
C. 3 फक्त
D. वरील सर्व

Answer ||| C

Solution |||

आदेशामक व सुचनात्मक नियोजन प्रणाली बरोबरच सध्या नवीन नियोजन प्रणाल्या वर्तनात्मक अर्थशास्त्र विकासाबरोबर उदयास आल्या.

प्रणाली दृष्टीकोन हा दृष्टीकोन आतापर्यंत भारतासह पूर्ण जग वापरत होते, नियोजनाचा हा दृष्टीकोन मूल्यविरहीत आहे हा फक्त लक्ष्याधारित आहे. सामाजिक सांस्कृतिक चलाकडे हा दृष्टीकोन लक्ष देत नसल्याने हा पूर्ण जगात लोकप्रिय होता.

मानक दृष्टीकोन - वर्तनात्मक अर्थशास्त्राच्या प्रगतीने हा दृष्टीकोन सध्या 21 व्या शतकात लोकप्रिय ठरत आहे. जागतिक पातळीवर जागतिक आनंदी अहवाल 2012 मध्ये या दृष्टीकोनाला अधोरेखित केले गेले. भारताच्या 2010-11 च्या आर्थिक सर्वेक्षणात याचे भारतासाठीचे महत्त्व नमूद करण्यात आले. हा दृष्टीकोन मुल्याधारित असल्याने वाढकेंद्रीत दृष्टीकोनाबरोबर देशातील सामाजिक सांस्कृतिक स्थितीवरती आधारलेला असतो.

3.पुढीलपैकी सत्य विधाने ओळखा

1. मिन्हास कार्यागटाने ग्रामीण तसेच शहरी गरीबी रेषा शोधली.

2. बर्धन अभ्यासगट व मिन्हास कार्यागटाने परस्पर विरोधी निष्कर्ष मांडले.

खालील कोड वापरुन योग्य पर्याय निवडा.

A. 1 फक्त
B. 2 फक्त
C. दोन्ही

D. दोन्हीही नाही

Answer ||| B

Solution |||

मिन्हास अभ्यासगटानुसार ग्रामीण गरीबीसंदर्भात त्यांनी 1956-57 ते 1967-68 या दहा वर्षांची आकडेवारीवरून काही निष्कर्ष काढले ते पुढीलप्रमाणे होते-

• ग्रामीण गरीब लोकांची संख्या ही ज्या वर्षी चांगले पिक येईल त्यावर्षी कमी होते,

• 1956-57 ते 1967-68 या काळात ग्रामीण गरीब लोकांची टक्केवारी कमी झाली.

(1956-57- 65. 7%, 1967-68-50. 61%)

बर्धन अभ्यासगट (ग्रामीण गरीब) त्यांनी 1960-61 ते 1968-69 दरम्यान ची आकडेवारी मांडली.

• त्यांचा निष्कर्ष हा मिन्हास अभ्यासगटाच्या निष्कर्षाहून उलट होता.

• त्यांच्या आकडेवारीनुसार 1960-61 च्या ग्रामीण गरीब टक्केवारीत 1968-69 पर्यंत वाढ झाली.

(1960-61- 38% ग्रामीण गरीब ) (1968-69- 54. 1%ग्रामीण गरीब )

4.पुढीलपैकी सत्य विधाने ओळखा

1. संसद आदर्श ग्राम योजना 1993 मध्ये सुरू झाली.

2. यामध्ये लोकसभा खासदार त्याच्या मतदार संघातील कोणतेही गाव दत्तक घेऊ शकतो.

3. संसद आदर्श ग्राम योजनेला सांझी म्हणूनही ओळखले जाते.

खालील कोड वापरून योग्य उत्तर निवडा:

A. 1 फक्त
B. 2 फक्त
C. 3 फक्त
D. वरील सर्व चूक

byjusexamprep.com

Answer ||| C

Solution |||

संसद आदर्श ग्राम योजना-

11 ऑक्टो 2014 ( जयप्रकाश नारायण जयंती) सुरुवात

• खासदाराने प्रत्येक वर्षी 1 गाव दत्तक घेऊन त्याचा एकात्मिक विकास करणे लक्ष्ये

• गाव निवडताना असलेले निकष-

a. यामध्ये सपाट भाग -3000-5000 लोकसंख्या

b. दुर्गम भाग - 100 3000 लोकसंख्या

• खासदाराचे गाव व त्याचे सासरवाडीचे गाव त्याला दत्तक घेता येणार नाही.

• 2024 पर्यंत प्रत्येकी 8 गावांचे लक्ष्य ठेवण्यात आले. (हे सुरुवातीला 10 गाव असे होते)

• सांझी म्हणूनही या योजनेला ओळखले जाते.

5.खालीलपैकी असत्य विधाने ओळखा .

1. विश्वेश्वरय्या योजनेत समाजवादी अर्थव्यवस्थेप्रचे समर्थन केले गेले.

2. सर्वोदय योजनेत गांधीवादावर भर देण्यात आला.

3. गांधी योजना 1945 साली मांडण्यात आली.

खालील कोड वापरून योग्य उत्तर निवडा:

A. 1 व 3 फक्त
B. 2 व 3 फक्त
C. वरील सर्व
D. एकही नाही.

Answer ||| A

byjusexamprep.com

Solution |||

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताचा एकात्मिक विकास व्हावा यादृष्टीने नियोजन आयोगाची स्थापना झाली परंतु ही स्थापना एकाएकी न होता स्वातंत्र्यपूर्व तसेच स्वातंत्र्योत्तर काळातील योजनाचा परिपाक होती.

1934 - विश्वेश्वरय्या योजना - त्यांनी योजना ही भांडवलशाही अर्थव्यवस्थेप्रमाणे असावी असे मांडले.

1938- कांग्रेस योजना - राष्ट्रीय नियोजन समितीची स्थापना सुभाषबाबूंनी केली व जवाहरलाल नेहरू अध्यक्ष होते

1944- गांधी योजना - गांधीवादी श्रीमान नारायण अग्रवाल यांनी ही योजना मांडली यात ग्रामव्यवस्थेवर भर

1945 - लोक योजना - मानवेंद्रनाथ रॉय यांनी ही योजना मांडली

1950 - सर्वोदय योजना - जयप्रकाश नारायण यांनी ही मांडली,ही योजना गांधीवादावर आधारित होती

6.खालीलपैकी सत्य विधाने ओळखा.

1. भारतीय अर्थव्यवस्थेची 2. 5 % आर्थिक वाढ म्हणजे हिंदू आर्थिक वाढ म्हणून ओळखली जायची.

2. प्रो. राज कृष्णा यांनी हिंदू आर्थिक वाढ हा शब्द प्रथम वापरला.

3. पाचव्या योजनेपासून आजतागायत आर्थिक वाढीचे लक्ष्य स्थूल (सकल) देशांतर्गत उत्पादनाच्या स्वरूपात मांडले जाते.

खालील कोड वापरून योग्य उत्तर निवडा:

A. 1 व 2 फक्त
B. 1 व 3 फक्त
C. 3 व 2 फक्त
D. वरील सर्व

Answer ||| C

Solution |||

नियोजन आयोगाने पहिल्या तीन योजनांसाठी वाढ दराचे लक्ष्य राष्ट्रीय उत्पन्न(NI) या निकषावर ठेवले होते.

• चौथ्या योजनेसाठी वाढ दराचा निकष हा निव्वळ देशांतर्गत उत्पादन(NDP) हा झाला व

• पाचव्या योजनेपासून तर आजतागायत हे लक्ष्य स्थूल (सकल) देशांतर्गत उत्पादनाच्या(GDP) स्वरूपात मांडले जाते

byjusexamprep.com

• पहिल्या पाच योजनांचा सरासरी वाढ दर हा 3. 5 राहिला ज्याला अर्थतज्ज्ञ प्रो. राज कृष्णा हे 'The Hindu Rate of Growth ' म्हणत व त्यानंतर सहाव्या योजनेनंतर तो वाढतच राहिला. सहाव्या व सातव्या योजनेसाठी तो सरासरी 5. 8% पर्यंत पोहोचला व आजतागायत तो या सरासरीच्या आसपासच राहिला आहे.

7.पुढील प्रश्नाचे पर्यायातून योग्य उत्तर निवडा.

1. संविधान कलम 114 नुसार अनुदान मागण्या राष्ट्रपती संमतीने फक्त लोकसभेत मांडल्या जातात.

2. वार्षिक वित्त विधेयक हे विधेयक विंनियोजन विधेयकानंतरच पारित करता येते.

खालील कोड वापरून योग्य उत्तर निवडा:

A. 1 फक्त
B. 2 फक्त
C. 1 व 2
D. यापैकी नाही

Answer ||| B

Solution |||

अर्थसंकल्प पुढील क्रमाने मांडला जातो

1. अर्थसंकल्प सादर करणे-
केंद्रीय वित्त मंत्री अर्थमंत्रालयाच्या आर्थिक कामकाज विभागणे तयार केलेले वार्षिक वित्तीय विवरण प्रथम लोकसभेत मांड तात नंतर ते राज्यसभेत मांडतात.

2. दोन्ही सभागृहात अर्थसंकल्पावर चर्चा- अर्थसंकल्प सादर केल्यानंतर साधारण आठवडाभर संसदेत चर्चा होते. चर्चेनंत र राज्यसभेची भूमिका संपते. यापुढील कामकाज लोकसभेत पार पडते. राज्यसभा फक्त धन विधेयक मंजुरीचे काम करते.

3. अनुदान मागण्या व कपात प्रस्ताव-
अनुदान मागण्या राष्ट्रपती संमतीने फक्त लोकसभेत मांडल्या जातात. व कपात प्रस्तावही लोकसभेत मांडले जातात.

4. विंनियोजन विधेयक-
अनुदान व इतर अर्थसंकल्पीय खर्च हा संचित निधीतून दिला जात असल्याने राज्यघटना कलम 114 नुसार तो खर्च करता यावा यासाठी विंनियोजन विधेयक संसदेत पारित करावे लगेते. हे धन विधेयक असल्याने राज्यसभा यास संमती देते.

byjusexamprep.com

5. वार्षिक वित्त विधेयक-
हे ही धन विधेयकच असते हे विधेयक विनियोजन विधेयकानंतरच पारित करता येते या विधेयकमुळे अर्थसंकल्पाला कायदेशीर स्वरूप प्राप्त होते.

8.खालीलपैकी सत्य नसलेली विधाने ओळखा.

1. स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना 1 एप्रिल 1997 पासून सुरू करण्यात आली.

2. दशलक्ष विहिरींची योजना ही स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेचा भाग झाली.

3. नोव्हेंबर 2015 मध्ये 'दीनदयाल अंत्योदय योजना-राष्ट्रीय ग्रामीण आजीविका अभियान'सुरू झाले.

खालील कोड वापरून योग्य उत्तर निवडा:

A. 1 फक्त
B. 2 फक्त
C. 3 फक्त
D. सर्व चूक

Answer ||| A

Solution |||

स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना

सुरुवातः 1 एप्रिल 1999 पासून पुढील सहा योजनांचे एकत्रिकरण करून ही योजना सुरू करण्यात आली.
i) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम ii) स्वयंरोजगारासाठी ग्रामीण तरूणांना प्रशिक्षण iii) ग्रामीण क्षेत्रातील स्त्रिया व मुलांचा विकास iv) दशलक्ष विहिरींची योजना v)गंगा कल्याण योजना vi) ग्रामीण कारागीरांना सुधारित औजारांचा पुरवठा.

योजनेची उद्दिष्ट्ये---i) या योजनेत कुशल मजुरी असणाऱ्या स्वयं-
रोजगाराच्या सर्व बाबींचा सर्वांगीण विचार करण्यात आला. त्यामध्ये गरीब लोकांना स्वयं-
सहाय्यता गटांमध्ये संघटित करणे, प्रशिक्षण, वित्तपुरवठा, तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा तसेच विपणन इत्यादींचा समावेश होता.
ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे या योजनेचे लक्ष्य गट होते. मात्र त्यातही दुर्बल घटकांसाठी विशेष सुविधा होत्या.
एकूण सुविधांपैकी 50 टक्के SCs/ST साठी 40 टक्के स्त्रियांसाठी तर 3 टक्के अपंगासाठी राखून ठेवण्यात आली होती.

राष्ट्रीय ग्रामीण आजीविका अभियान

ग्रामीण विकास मंत्रालयाने प्रो. राधाकृष्ण समितीच्या शिफारसींच्या आधारे 2010-11 मध्ये स्वर्ण जयंती स्वरोजगार योजनेची पुनर्रचना करून 3 जून, 2012 रोजी 'राष्ट्रीय ग्रामीण आजीविका अभियान' सुरू केले आहे. या अभियानाला 'आजीविका' असे नाव देण्यात आले आहे. नोव्हेंबर 2015 मध्ये या अभियानाचे नाव बदलून 'दीनदयाल अंत्योदय योजना-राष्ट्रीय ग्रामीण आजीविका अभियान' असे करण्यात आले आहे.

9.खालीलपैकी काय सत्य आहे.

1. ईशान्य भारतात सिक्किम राज्याचे लिंग गुणोत्तर ईशान्येतील इतर राज्यांहूनउत्तम आहे.

2. दक्षिण भारतात तमिळनाडूची लोकसंख्या घनता दक्षिणेतील इतर राज्यांहून जास्त आहे.

3. ईशान्य भारतात त्रिपुरा राज्याचे लिंग गुणोत्तर ईशान्येतील इतर राज्यांहून कमी आहे.

खालील कोड वापरून योग्य उत्तर निवडा:

A. 1 फक्त
B. 2 फक्त
C. सर्व असत्य
D. 2 व 3 फक्त

Answer ||| C

Solution |||

दक्षिण भारतातील लोकसंख्या घनता

byjusexamprep.com

| राज्य | लोकसंख्या घनता (2011)(दर हजार किमी वर्ग) |
|---|---|
| केरळ | 859 |
| तमिळनाडू | 555 |
| कर्नाटक | 319 |
| आंध्र प्रदेश | 308 |
| तेलंगणा | 307 |

वरील आकडेवारीनुसार खालील निष्कर्ष निघतात.

1. केरळ या राज्याची लोकसंख्या घनता ही दक्षिणात्य राज्यांमध्ये सर्वात जास्त आहे.

2. तेलंगणा या राज्याची लोकसंख्या घनता ही दक्षिणात्य राज्यांमध्ये सर्वात कमी आहे.

ईशान्य भारतातील लिंग गुणोत्तर

byjusexamprep.com

| राज्य | लिंगगुणोत्तर |
|---|---|
| मेघालय | 989 |
| मणीपुर | 985 |
| मिझोरम | 976 |
| त्रिपुरा | 960 |
| आसाम | 958 |
| अरुणाचल प्रदेश | 938 |
| नागालँड | 931 |
| सिक्किम | 890 |

वरील आकडेवारीनुसार खालील निष्कर्ष निघतात.

1. देशाच्या सरासरी लिंगगुणोत्तरापेक्षा ईशान्य भारतातील लिंग गुणोत्तर जास्त आहे.

2. परंतु अरुणाचल प्रदेश,नागालँड व सिक्किम यांचे लिंग गुणोत्तर देशाच्या सरासरी लिंगगुणोत्तरापेक्षा कमी आहे.

10.खालीलपैकी असत्य विधाने ओळखा.

1. 1975 मध्ये कुटुंब नियोजन कार्यक्रमाचे नाव बदलून कुटुंब कल्याण कार्यक्रम असे करण्यात आले.

2. 1976 मध्ये लोकसंख्या वाढीचा सरासरी दर 2. 2% इतका होता.

3. 1976 मध्ये जन्मदर 30 इतका होता.

खालील कोड वापरून योग्य उत्तर निवडा:

A. 1 व 2 फक्त
B. 2 व 3 फक्त
C. 1 व 3 फक्त

D. वरील सर्व

Answer ||| C

Solution |||

पहिले लोकसंख्या धोरण 1976

16 एप्रिल,
1976 रोजी संसदेत पहिले राष्ट्रीय लोकसंख्या धोरण संमत करण्यात आले. या धोरणामध्ये जन्मदर हजारी 35 वरून 25 वर आणणे व 1984 पर्यंत लोकसंख्या वाढीचा दर 2. 2%हून 1.
4%वर आणणे. व विवाहाचे कायदेशीर वय मुलांचे 18 वरुन 21 वर्षे,तर मुलींचे 15 वरुन 18 वर्षापर्यंत कायदा करून वाढव ले जाईल असे ठरले.
1976 चे धोरण आणिबाणीच्या काळात लागू करण्यात आल्याने त्यात सक्तीच्या कुटुंब नियोजनाचा आभास होऊ लागला. त्याच्या तरतुदींतर्गत महाराष्ट्र सरकारने अनिवार्य कुटुंब नियोजनासाठी विधेयकही तयार केले होते. मात्र राष्ट्रपतींची संमती न मिळाल्याने ते संमत होऊ शकले नाही. आणिबाणी दरम्यान कुटुंब नियाजतन कार्यक्रम अधिक कठोरतेने लागू करण्यात आल्याने काही जनविरोधी कृत्येही झाल्याने 1977 च्या संसदीय निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्ष हरला जनता पक्षाचे सरकार अस्तित्वात आले.

जनता पार्टीने 28 एप्रिल,
1977 रोजी नवीन लोकसंख्या धोरण जाहीर केले. त्यानुसार कुटुंब नियोजन पुन्हा स्वैच्छिक कार्यक्रम बनविण्यात आला, ज्या मध्ये सक्ती दबावास कोणतेही स्थान नाही. लोकसंख्या शिक्षण लोकसंख्या धोरणाचे विभिन्न अंग मानण्यात आले. तसेच विशे ष म्हणजे याच वर्षी कुटुंब नियोजन कार्यक्रमाचे नाव बदलून कुटुंब कल्याण कार्यक्रम असे करण्यात आले. त्यामध्ये माता व मुलांच्या आरोग्याचे रक्षण, मातृत्व आणि आरोग्य सुधारणा कार्यक्रम सम्मिलीत करण्यात पोषण आले. तसेच ऐच्छिक शस्त्र क्रियांसाठी प्रोत्साहने जाहीर करण्यात आली. 1978 मध्ये बाल विवाह प्रतिबंध कायदा 1929
(शारदा कायदा) यामध्ये दुरूस्ती करून मुलांचे लग्नाचे वय 18 वरुन 21 तर मुलींचे लग्नाचे वय 15 वरुन 18 करण्यात आले
.